प्रकरण पहिले

# अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन व साम्यवादी दृष्टिकोन

# प्रकरण पहिले
# अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन व साम्यवादी दृष्टिकोन

## ०१. प्रस्तावना

अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेल्या एकूणच साहित्य प्रकारातील त्यांच्या कादंबरी लेखनातून विविध स्तरावरील दु:खे, संघर्ष मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

एकूण जवळपास चाळीस कादंबऱ्यांची यादी त्यांच्या नावावर आहे. या त्यांच्या कादंबऱ्यांचा विचार करताना त्यांच्या काही कादंबऱ्यांवर निश्चितच साम्यवादी विचारांचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वात रुजलेल्या साम्यवादी दृष्टिकोनाचा अभ्यास करताना मुळापासूनच 'साम्यवाद' ही संकल्पना, त्याची वैशिष्ट्ये पाहणे गरजेचे वाटते. म्हणूनच या प्रकरणात त्या अंगानेच विवेचन करण्याचे ठरविले आहे. त्याबरोबरच अण्णा भाऊ साठे यांच्या अगोदरही 'साम्यवादी' विचारदृष्टी मराठी साहित्यात पाहायला मिळते. याविषयीचेही विवेचन या प्रकरणात महत्त्वाचे ठरणार आहे.

मराठी साहित्याची 'साम्यवादी' परंपरा मांडल्यानंतर अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वावर साम्यवादी विचारांच्या प्रभावापूर्वी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कोणत्या परिस्थितीत झाली? त्यांच्या लेखनाच्या प्रेरणा कोणकोणत्या होत्या ? व त्या आधारे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये, इतर साहित्यापेक्षा त्यांच्या साहित्याचे वेगळेपण, त्याविषयीचा खुद्द कादंबरीकाराचा दृष्टिकोन काय आहे ? याचे साधक-बाधक पण सर्वांगाने विवेचन करुन अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरीलेखन व साम्यवादी दृष्टिकोन यांचे विश्लेषण या प्रकरणाचा हेतू ठरणार आहे.

## ०२. साम्यवाद : संकल्पना व स्वरुप

कार्ल मार्क्स हा साम्यवादी विश्वक्रांतीचा कृतिशील पुरस्कर्ता समाजशास्त्रज्ञ, समाजवादी विचारसरणीचा प्रणेता ठरतो. रशियामध्ये १९१८ च्या सुमारास जी साम्यवादी विचारांची क्रांती झाली त्यापाठीमागेही मार्क्सच्या विचारांचीच प्रेरणा असल्याचे दिसते. त्यानंतर चीनमधील हुकूमशाहीला शह देण्यासाठी १९५९ मध्ये क्रांती झाली त्याच्या मुळाशीही मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा भाग दिसतो. ईश्वर न मानणारा, नास्तिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या कार्ल मार्क्स याने १८४२ रोजी ऱ्हाईनिश्चे झाइटुंग या वृत्तपत्रातून साम्यवादाची मांडणी केली.

सार्वजनिक संपत्तीला वर्गविरहित समताप्रधान समाजव्यवस्थेत मार्क्सने प्राथमिक साम्यवाद असे नाव दिले. समाज हळूहळू विकसित होवू लागला, समाजाच्या या प्रगतीबरोबरच खाजगी संपत्ती निर्माण होऊ लागली आणि आर्थिक वर्गाची रचना या खाजगी संपत्तीने तयार केली. इथूनच वर्गकलहास प्रारंभ झाला. त्यानंतर वर्गकलहाचा इतिहास निर्माण झाला. शेती व कुटीरोद्योगाबरोबर खाजगी संपत्ती अधिक निर्माण झाली. त्यातूनच खाजगी संपत्तीस आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा श्रमिक दासवर्ग निर्माण झाला. याच गुलामांकडून खाजगी मालक उत्पादन करवून घेऊ लागले; आणि जमिनींचे मालक त्यांच्यावरचे सत्ताधीश बनले. व्यापारी वर्ग निर्माण होऊन मोठमोठे भांडवलदार तयार झाले. या भांडवलदारांनी जमीनदारांना सत्ताभ्रष्ट करुन आपले राज्य प्रस्थापित केले. हा भांडवलशाहीने आणलेले नवीन बदलच होता. भांडवलशाहीच्या जगात मात्र, भांडवलदारांना मोठे करणारा कामगार वर्ग हा प्रबळ बनतो. हीच प्रबळ शक्ती संघटनेच्या शक्तीखाली क्रांती घडवून आणते आणि भांडवलदारांच्या वर्चस्वाला शह देऊन राजकीय सत्तासुद्धा कामगारवर्ग मिळवितो. अशा क्रांतीतून लुबाडणाऱ्यांकडून त्यांचा तो अधिकार काढून घेतला जातो. पुढे राजकीय नियंत्रणाची गरज संपून वर्गविहीन समाज अस्तित्त्वात येतो. हे परिवर्तन मार्क्सवादाच्या निष्कर्षाप्रत पोहोचते.

भांडवलदारांनी समाजाला जे एका आर्थिक स्तरामध्ये बांधून ठेवले तोच आर्थिक विचार मार्क्सवादात आढळतो. भांडवलदार नफ्याचा व्यवहार करण्यास नेहमीच उत्सुक असतो. नफा म्हणजे शोषण व पिळवणूक. नफ्याला मार्क्सवाद अतिरिक्त मूल्य मानतो. म्हणूनच भांडवलदार व कामगारांचे हितसंबंध परस्परविरोधी होतात. यातूनच वर्गकलहाचे रुपांतर वर्गयुद्धात होते. मार्क्सवादात वर्गकलह व वर्गयुद्ध यांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण वर्गकलहामुळेच मानवसमाजाचा इतिहास घडतो ही मार्क्सची धारणाआहे. साम्यवादी जाहिरनाम्यात मार्क्स म्हणतो,

''भांडवलशाही जगात वर्गकलह सतत वाढतच जाणार आहे आणि त्या कलहातूनच क्रांती होऊन समाजवाद निर्माण होणार आहे.''[१]

मार्क्सच्या तत्त्वज्ञानातून हेच लक्षात येते की, भांडवलशाहीची चौकट मोडण्याचा प्रयत्न कामगारच करु शकेल व वर्गविहिन समाजव्यवस्था निर्माण होईल. वर्गविहीन समाजव्यवस्थेबरोबरच शोषणविरहित स्वातंत्र्य येऊ शकते हेच मार्क्सवादाच्या तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट असल्याचे जाणवते. वर्गीय पिळवणुकीच्या मुक्ततेनंतर प्रत्येकालाच त्याच्या गरजेप्रमाणे काम व धन मिळण्याचेही स्वप्न साकार होते, म्हणूनच जोपर्यंत वर्गव्यवस्थेवर आधारलेला समाज आहे तोपर्यंत माणसाच्या

मानवत्वालाच वर्गीय मर्यादा पडलेल्या असतात. या मर्यादांमधून बाहेर पडण्यासाठी आर्थिक जीवनाचा समाजाला असलेला पाया बदलला पाहिजे.

या सर्व तत्त्वज्ञानातून हेच लक्षात येते की, केवळ तार्किकतेवर हे तत्त्वज्ञान व ही साम्यवादाची संकल्पना अवलंबून नाही तर ती प्रत्यक्ष वास्तवतेच्या पायावर उभी असल्याचे जाणवते. मार्क्सवाद हा मानवजातीच्या उत्थानावर लक्ष केंद्रित करतो. मार्क्सवादाबद्दल रा. भा. पाटणकर म्हणतात,

''मार्क्सवाद हे जीवन नुसते समजण्यात धन्यता मानणारे तत्त्वज्ञान नाही; जीवनात बदल घडवून आणणारे हे तत्त्वज्ञान आहे.''[२]

या सर्व विवेचनातून साम्यवादाचा अर्थ हाच सांगता येतो की, साम्यवाद म्हणजे समानता मिळण्यासाठी केलेला संघर्षच होय. ज्यामध्ये कामगारांच्या एकजुटीच्या आधारे भांडवलदारांची एकाधिकारशाही उलथून टाकून त्या ठिकाणी वर्गाच्या मर्यादा ओलांडून समाजाचा मूळ पाया असलेली आर्थिक समानता आणण्याचा प्रयत्न करणे. यातूनच समाज आपोआप बदलण्याचा विश्वासही येऊ शकतो.

पुरातन साम्यवादी समाजापासून पुढे येऊ पाहणाऱ्या सुबत्तेच्या साम्यवादी समाजापर्यंत मानवसमाजाच्या प्रवासाबद्दल हा मार्क्सवाद सांगतो. वास्तव हे परिस्थितीनुरूप बदलत असते. हे भांडवलदारांच्या हुकूमशाहीला आव्हान देऊन समाजाचा घटक म्हणून स्त्री-पुरुषांना आपापला विकास साधता येईल हा आत्मविश्वास म्हणजे साम्यवाद होय.

भांडवलशाही समाजव्यवस्थेतील अनेक दोषांची जाणीव होऊन कोट्यवधी दलितांना त्या समाजव्यवस्थेत भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टांबद्दल कळवळा येऊन त्यांना त्या दु:खापासून कायमचे मुक्त करावे हा साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या मांडणीतील महत्त्वाचा हेतू ठरतो. शोषकांविरुद्ध संघर्ष केल्याशिवाय शोषितांची प्रगती होणार नाही व त्यासाठी बंड हा एकच मार्ग ही मार्क्सची भूमिका होती. मार्क्सवादात सामाजिकतेला अत्यंत महत्त्व आहे. 'शोषणमुक्त समाजनिर्मिती करणे' हा मार्क्सवादाचा पाया आहे. समाजसापेक्षतेला मार्क्सवादी विचारात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. समाजविचाराला डावलून कोणतेही तत्त्वज्ञान मूळ धरु शकत नाही.

या सर्व विवेचनावरुन साम्यवादाची वैशिष्ट्ये हीच मांडता येतील की,

१) साम्यवाद ही समतेचा हक्क सर्वांपर्यंत पोहचविण्याची मार्क्सने दिलेली क्रांतीची वाट आहे.

२) साम्यवादातून मानवाच्या आर्थिक उन्नतीसाठीचा प्रयत्न मोठ्या प्रकर्षाने मांडण्यात आला.

३) 'साम्यवाद' हा वर्गीय भेदावर अधिक प्रकर्षाने प्रहार करतो व सामाजिक क्रांतीचा संदेश कामगारांच्या लढ्यामधून जनमानसात पोहचवितो.

४) शोषित वर्ग - कामगार वर्ग यांना पिळवणूक करणाऱ्या शोषकांच्या टाचेखालून मुक्त करण्याचा वसाच साम्यवाद घेतो.

५) माणूस स्वत: जगतो आणि दुसऱ्याला जगवतो. पण त्याच माणसाचे दमन-शोषण करुन आर्थिक प्राबल्य असणाऱ्या वर्गाने त्यांचे माणूसपण नाकारुन त्यांच्यावर अधिराज्य गाजविण्याच्या वृत्तीलाच साम्यवादाने नाकारले.

साम्यवादाने आर्थिक समानतेवर अधिक भर दिला. पण, याच साम्यवादी विचारसरणीचा भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात आपण विचार करतो तेव्हा, भारतीय समाजव्यवस्थेतील जातीभेद हे वर्गव्यवस्थेपेक्षा वर्णभेदाबाबत अधिक प्रभावी आहेत. त्यामुळेच भारतीय साम्यवादाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला गेला कारण, भारतासारखा देश जो मानसिक पातळीवर कर्मकांडांच्या खोल गर्तेत रुतलेला, जन्म-पुनर्जन्माच्या चक्रात अडकलेला, जाती-उपजातीच्या तत्त्वाने विभागलेला यांना वर्गीय जाणिवेची भाषा कळणे अशक्यच आहे. त्यामुळेच भारतीय समाजातील शोषितांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची, गुलामीची जाणीव करुन देऊन त्यांच्यात त्याविरुद्ध विद्रोहाची भावना जागी करावी लागते. तर, अशा या मानवमुक्तीच्या लढ्यासाठी केवळ मार्क्सचा विचार उपयोगी ठरत नाही तर, त्याच्या जोडीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्रोहाची ठिणगी त्यांच्या मनात पेटवावी लागते. म्हणूनच, आंबेडकर मार्क्सच्या क्रांतीमार्गापेक्षा गौतम बुद्धांच्या विचाराकडे वळले असावेत. भारत देशातील मानसिकता, पूर्वजन्मीच्या, पाप-पुण्याच्या कल्पना यांच्या विचारात मार्क्सची क्रांती, कामगारांची हुकूमशाही यापेक्षा मानवाच्या मानवतेच्या पायावर उभी राहणारी लोकशाहीची शासनपद्धती अधिक योग्यरित्या आंबेडकरांनी समजून घेतली व तीच रुजविण्याचा प्रयत्न केला.

कार्ल मार्क्स व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही तत्त्ववेत्यांचा संयुक्त विचार अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून मांडला.

## ०३. मराठी साहित्यातील साम्यवादी विचारांची परंपरा

भारतातील उच्चजाती वर्गातील माणसे, तसेच अशाच सामाजिक पार्श्वभूमीतून येणारे संवेदनशील लेखक विचाराने मार्क्सवादी असले तरी प्रवृत्तीने मात्र जातीयवादीच राहिले. तरीही

काही प्रमाणात साहित्यविश्वावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव पडला या प्रभावाखाली काही काळ सर्वच वाङ्मयप्रकार राहिले.

१९२० ते १९४० या सुमारास मराठी कादंबरीवर साम्यवादाचा थोडाफार परिणाम दिसतो. त्यातूनच श्री. अ. डांगे हे साम्यवादी चळवळीचे प्रवर्तक मानल्याचेही काही वाङ्मयीन इतिहासकारांनी म्हटले आहे.[३]

त्यांच्यानंतर श्री. व्यं. केतकर, वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यात पुरोगामी विचार आणि साम्यवादाची बीजे दिसून येतात. कामगारांची चळवळ, त्यांच्या अडचणी, संप हे विषय घेऊन खांडेकरांनी 'क्रौंचवध' यांसारख्या कादंबऱ्यांचे लेखन केले.

केतकरांच्या 'ब्राह्मणकन्या', 'विचक्षणा' या कादंबऱ्यातून साम्यवादाचा परिचय येतो. केतकरांच्या कादंबऱ्यांतून साम्यवादी विचारांची पात्रेही दिसून येतात. साम्यवादी विचाराचा केंद्रिभूत मूळ भाग असलेले गिरण्यांचे मालक, उत्पादन विक्रीची व्यवस्था, संपत्तीची समान वाटणी असे विषय कादंबऱ्यातून साम्यवादाच्या प्रभावामुळे येऊ लागले.

वा. म. जोशी यांच्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीत विश्वकुटुंबवाद व निरीश्वरवादाचे दर्शन घडते. तसेच वरेरकरांच्याही कादंबऱ्यात गिरणी कामगारांच्या समस्यांचे वर्णन येऊन गेले. साम्यवादावर, चर्चा करणाऱ्याही अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. कलावादी फडके यांनी साम्यवादी नायक उभे केले. त्यांची 'उन्माद' ही कादंबरी व तिचा नायक श्रीनिवास क़ट्टर साम्यवादी आहे.

अशाप्रकारे, साम्यवादाचा मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता या सर्वच प्रकारात साम्यवादी ऊहापोह आढळतो.

कवितेच्या प्रांतात शरश्चंद्र मुक्तिबोधांनी साम्यवादी विचार मांडला. परंतु ही सर्व मांडणी काहीशी उपरी वाटते. कारण, भारतीय समाज रचनेच्या वर्णवादी, जातीयवादी व्यवस्थेत, वर्गवादी असलेला मार्क्सवादी विचार काही अंशी दुबळा वाटतो. शोषक आणि शोषितांमधील अंतर दूर करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला पण, केवळ आर्थिक समतेने भारतीय दलितांचा प्रश्न सुटणार नव्हता. दलितांना केवळ दारिद्र्यासाठी म्हणजेच आर्थिक प्रश्नांविरुद्धच केवळ संघर्ष करुन चालणार नव्हते तर, येथील जातीय व्यवस्थेलाच त्यांना आव्हान द्यावयाचे होते. म्हणून दलित साहित्यिकांनी आपला लढा आर्थिक आणि सामाजिक विषमता या दोन पातळ्यांवर चालू ठेवला. आर्थिक समानता देणारा मार्क्सवाद मात्र कलेच्या क्षेत्रात अभिव्यक्तीची बंधने आणतो. तेव्हा नारायण सुर्वे यांच्यासारखे साहित्यिक त्यापासून स्वत:ला वेगळे ठेवतात.

एकूण सर्वच दलित लेखक, कवी मार्क्सच्या विचारांपेक्षा आंबेडकरी विचाराला अधिक जवळचे मानतात तसे त्यांच्या साहित्यातूनही प्रकर्षाने जाणवते.

''खरे म्हणजे रोज रात्री मार्क्स मला थोपटून झोपवतो तर, आंबेडकर मात्र आतड्यात लाव्हा भरुन खडबडवतो.''[४]

बाबूराव बागूल यांसारखे श्रेष्ठ दर्जाचे दलित साहित्यिक तर, मार्क्सवादाला पूर्णपणे विरोधच करतात. कारण त्यांच्यामते, मार्क्सवाद हा वर्गवादी जाणिवेला विरोध करतो तर, भारतीय दलितांवर होणारा अन्याय वर्णवादी आहे. त्यामुळे त्यांचा मूळ धागाच वेगळा असल्यामुळे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे दलितांचे प्रश्न सोडवण्यास मदत होऊ शकत नाही. त्यासाठी आंबेडकरवादी विचारांनाच प्रामाणिकपणे अनुसरले पाहिजे व स्वोद्धारासाठी आशावादी राहिले पाहिजे.

एकंदरित मराठी साहित्यात सुरुवातीपासून साम्यवादाचा प्रभाव जाणवत असला तरी तितक्या प्रभावीपणे उतरत नाही. दलित साहित्यामागे मात्र प्रामुख्याने आंबेडकरी प्रेरणा प्रधान असली तरी या साहित्यातून कमी अधिक प्रमाणात मार्क्सवादी विचारकणही इतस्ततः विखुरलेले आढळतात. निदान प्रारंभी तरी आर्थिक शोषणाला बळी पडणाऱ्या या दलित वर्गाला मार्क्सवाद मुक्तिदाताच वाटला. दलित साहित्यातून दिसत असलेला नकार आणि विद्रोह म्हणजे मार्क्सच्या आदर्श समाजव्यवस्थेच्या कल्पनांना मूर्त रुप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची प्रमुख सूत्रे होत.

दलित लेखकांच्या स्वकथन, आत्मकथनातूनही दारिद्र्य आणि भुकेचे चित्रण आलेले आहे. त्यामागे मुख्यतः दलितांना सतत भेडसावणारी आर्थिक विवंचनाच आहे. अशाप्रकारे आंबेडकरांनी स्वीकारलेला मार्क्सच्या विचारसरणीचा हा प्रमुख भाग आहे. अण्णाभाऊंनी मार्क्सचा विचार सांगतानाही आंबेडकरांच्याच विचार चळवळीला पूरक भूमिका घेऊन वर्ग लढ्याबरोबर वर्ग जाती लढ्याचाही एकत्रित विचार मांडला. त्यामुळे अण्णाभाऊंचे लेखनापाठीमागील तत्त्वज्ञान हे केवळ मार्क्सच्या मार्क्सवादाचीच परिणती नसून, फुले, आंबेडकर आणि अण्णांच्या जीवनाविषयीचा स्वानुभव यांची संयुक्तपणे केलेली योग्य बांधणीच आहे.

अशाप्रकारे, अण्णाभाऊंपूर्व एकूणच कादंबरी ही हरिभाऊ आपटे यांच्या काळात सामाजिकतेच्या पातळीवर उतरत असताना तिला कधीही प्रचाराचा वा बोधवादाचा ठपका लागू न देता हरिभाऊंनी कादंबरीला सामाजिक सुधारणेच्या अंगाने कलात्मकतेच्या साथीने विकसित केले. यानंतर, कादंबरीकडे सामान्य जनमाणसाला आकर्षित करणाऱ्या फडके यांच्या कादंबरीत सुरुवातीला

हरिभाऊंची छाप दिसली तरीही नंतर मात्र ही कादंबरी पूर्णपणे रंजनाकडे वळल्याचे लक्षात येते. अत्यंत कल्पनारम्य वातावरण, तरुण-तरुणींच्या भावना उद्दीपित करणारे प्रसंग, त्यांची सुखस्वप्ने आणि फडके यांची भाषाशैली यामुळे त्यांच्या कादंबऱ्या अधिक आकर्षक ठरल्या. त्यांच्या 'भरतीची लाट', 'कुहू-कुहू', 'चांदणी' अशा काही कादंबऱ्यांमधून याचा प्रत्यय येतो. याउलट फडक्यांच्या कलावादानंतर खांडेकरांच्या जीवनवादी कादंबऱ्यांमध्ये, मानवतावाद, सामाजिक जीवनपद्धतीचा पुरस्कार हे लेखनविशेष जाणवतात. टीकात्मक, चर्चात्मक स्वरुपाच्या त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये श्रीमंतीमुळे गरिबांना लुबाडणारा जो मालक वर्ग यावर त्यांनी प्रामुख्याने ताशेरे ओढल्याचे लक्षात येते. त्यातूनच गरीब-श्रीमंत, मजूर-मालक असा शोषक-शोषितांचा संघर्षही त्यांनी रंगविला. अशाप्रकारे, खांडेकरांनी कादंबऱ्याना गांधीवादी, मार्क्सवादी विचारांच्या अंगाने शब्दरूप दिले. खांडेकरांच्या 'क्रौंचवध', 'पांढरे ढग' इ. कादंबऱ्या हाच परिणाम दर्शवितात. इ. स. १९२० ते १९५० या कालखंडात खांडेकरांबरोबर माडखोलकर, वरेरकर यांच्याही कादंबऱ्यांनी मध्यमवर्ग, कामगार वर्ग, शेतकरी वर्ग, मालक-मजूर लढा, अस्पृश्योद्धार, ग्रामोद्धार, यांसारख्या प्रश्नांना हाताळले. गांधीवादाबरोबरच मार्क्सवादी विचारांचाही प्रभाव तत्कालीन कादंबरी लेखकांवर झाल्याचे जाणवते. फडके यांची 'समरभूमि' या कादंबरीमध्ये साम्यवादी विचारसरणी दिसून येते. परंतु मार्क्सवादी विचारसरणीमध्ये जे सामुदायिकत्व अपेक्षित होते ते फडक्यापासून - वरेरकरांपर्यंत कोणाच्याही कादंबरीत आलेले नाही.

यानंतरही संज्ञाप्रवाही कादंबरी, प्रादेशिक कादंबरी अशी अनेक वळणे मराठी कादंबरीला मिळत गेली. त्यातही सहानुभूतीपेक्षाही प्रत्यक्ष अनुभूतीच अधिक वरचढ झाली, कल्पनेपेक्षा वास्तवच अधिक मनाचा ठाव घेऊ शकले म्हणूनच, या सर्व कादंबऱ्यांत अण्णाभाऊंची कादंबरी जिच्यात वास्तवतेला धरुन कलात्मकता आकार घेते. ती आपले वेगळेपण टिकवून ठेवते, आणि मार्क्सवाद, गांधीवाद, आंबेडकरी विचार यांचा मिलाफ कुठेही प्रचारकी अंगाने न करता त्या साहित्यशिल्पाची कलात्मकता आबाधित राखते. अण्णाभाऊंच्या साहित्यात सुरवातीपासूनच सर्व प्रकारच्या साहित्याचे रंग दिसले. प्रादेशिक साहित्याचे, ग्रामीण साहित्याचे, दलित साहित्याचे, मार्क्सवादी साहित्याचे अशा सर्व अंगांनी परिपूर्ण अशी कादंबरी अण्णाभाऊंनी दिली.

BARR. B... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ०४. अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

### ०४.१ कुलपरंपरा :

इ. स. १८१८ पासून सांगली जिल्ह्यातील 'वाटेगाव' येथे साठे घराणे स्थायिक होते. इ. स. १८१८ ते इ. स. १८७३ या काळात अण्णाभाऊंचे पंजोबा हे वाटेगावी रहात होते. इ. स. १८४१ साली त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव 'शिदोजी' असे होते. 'शिदोजी' यांना १८८२ मध्ये मुलगा झाला त्याचे नाव 'भाऊ' असे होते. पुढे भाऊ व वालुबाई यांचा विवाह होऊन त्यांच्या पोटी 'अण्णां'चा जन्म झाला. अण्णांचे नाव 'तुकाराम' ठेवले गेले. अण्णांची जन्मतारीख १ ऑगस्ट १९२०, त्यांच्या भावाचा म्हणजेच शंकरचा जन्म १९२५ मध्ये तर जाईबाई यांचा १९२७. नावाने 'तुकाराम' असलेला मुलगा पुढे साहित्यविश्वात 'अण्णा भाऊ साठे' म्हणून प्रसिद्ध झाला. त्यांचा मृत्यू १८ जुलै १९६९ मध्ये झाला. म्हणजेच, १ ऑगस्ट १९२० ते १८ जुलै १९६९ असा अण्णाभाऊंचा जीवनकाळ होय.

### ०४.२ अण्णाभाऊंचे छंद :

अण्णाभाऊंचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना अनेक छंद होते. निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गाच्या विविध रुपांचे अवलोकन करणे, निसर्गाशी समरस होण्याचे एक वेड अण्णाभाऊंना होते. अनेक डोंगरदऱ्यांमधून फिरुन नद्यांचे उगम, सरोवरे, जंगले, गुहा, पाहण्याचा छंद त्यांना होता. शिकार करणे, दांडपट्टा खेळणे, कुऱ्हाड चालविणे, गायी म्हशींच्या झुंजी लावणे आणि जनावरांच्या पाठीवर बसून डोहामध्ये दूरवर जाणे. यांचे वेड अण्णांना होते. खेड्यामध्ये असणाऱ्या यात्रांना हजर राहून तेथील दुकाने, कुस्त्या, डोंबाऱ्यांचे खेळ, पालख्यांच्या मिरवणुका, आणि पोवाडे, तमाशे, यांनी त्यांचे मन आकर्षुन घेतले. लोकगीते पाठ करण्याचाही त्यांना छंद होता. (अर्थात दुसरे लोक म्हणत ते लक्ष देऊन ऐकत असत.) लोकगीते गाऊन दाखविणे, वृद्ध मंडळींकडून शौर्य कथा ऐकणे, दंतकथा, आख्यायिका ऐकणे आणि त्या इतरांना तन्मयतेने सांगणे हे विविध छंद भावी आयुष्यात थोर साहित्यिक होण्यास कारणीभूत ठरले. अण्णाभाऊ मुळात प्रतिभा घेऊन जन्माला आलेले अव्वल दर्जाची प्रतिभा असलेले लेखक होते.

### ०४.३ अण्णाभाऊंची शैक्षणिक पार्श्वभूमी :

अण्णाभाऊ साठे यांचे तसे रूढ अर्थाने शिक्षण नाहीच. अण्णाभाऊंच्या वडिलांची त्यांनी शिकावे अशी इच्छा होती. अनेकवेळा पत्रातून तगादा लावल्यामुळे अण्णाभाऊंनी शाळेत प्रवेश

घेतला. हा काळ म्हणजे १९२८-२९ च्या दरम्यानचा असून दलितांच्या मुलांना त्या काळात वऱ्हांड्यात बसून शिकावे लागे. एखाद्या झाडाखालीही दलितांच्या मुलांची शाळा भरत असे. अण्णाभाऊंनी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर केवळ एक-दोन दिवसातच शिक्षकाबरोबर मतभेद झाले आणि शाळेला कायमचा पूर्णविराम दिला त्यानंतर अण्णाभाऊ मुंबईला निघून गेले.

अण्णा भाऊ साठे यांचे पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईला आगमन झाले. तिथे त्यांनी अनेक कष्टाची कामे केली. मुंबईमध्ये वरळी भागात ज्ञानदेव नावाच्या चुलत भावाशी त्यांची भेट झाली. ज्ञानदेवांनी अण्णाभाऊंची पूर्ण विचारपूस करुन त्यांना त्यांच्या घरी नेले. ज्ञानदेवाच्या घरामध्ये रामायण-महाभारतासारखे ग्रंथ, पोथ्या इ. चा संच होता. हे सर्व पाहून अण्णाभाऊंच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. काही दिवसानंतर अण्णाभाऊ ज्ञानदेवांच्या घरी जाऊ लागले. यावेळी मात्र आपण निरक्षर आहोत याची मनस्वी खंत अण्णाभाऊंना वाटू लागली. ''ज्ञानदेवाजवळ बसून रामायण-महाभारताच्या ग्रंथांचे पठण केले. पुढे त्यांनी अक्षर-ओळख भावाकडून करुन घेतली.''[५] अण्णाभाऊ साक्षर होण्यात ज्ञानदेवांचा मोठा वाटा आहे. हे नाकारता येत नाही.

मुंबईत अण्णाभाऊंचा प्रवेश अत्यंत खडतर प्रवासानंतर झाला. मुंबईची ओळख हळूहळू पटू लागली. कामाच्या शोधाच्या निमित्ताने संपूर्ण मुंबईतले जीवन उघड्या डोळ्यांनी पाहता आले. मुंबईत प्रवेश झाल्यानंतर अण्णाभाऊ व त्यांचे कुटुंबिय कामाला लागले. कामगारांच्या वस्तीतच ते रहात असल्यामुळे कामगारांचे संप, मोर्चे, हरताळ यांचा परिणाम त्या भागात लगेचच दिसून येत असे. पुढे उदरनिर्वाहासाठी अनेक प्रकारची कामे त्यांनी रोजंदारीवर सुरु ठेवली होती. त्यानिमित्ताने संपूर्ण मुंबई पायाखाली घातली आणि रस्त्याच्या पाट्यांवरची अक्षरओळख होऊन ते वाचायला शिकले. तो काळ स्वातंत्र्यापूर्वीचा असल्याने विविध राजकीय पक्ष, संघटना, कामगार चळवळी, विविध विचारांचे वारे वाहू लागले होते. त्या सर्व घटनांचा नकळत परिणाम अण्णाभाऊंच्या संवेदनशील मनावर होत होता. परंतु, त्यांच काळात अण्णा भाऊ साठे यांचे वडील भाऊ साठे यांचे निधन होऊन संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पूर्णपणे त्यांच्यावर येऊन पडली. घरातील गरिबीच्या परिस्थितीमुळे, रोजची भांडणे यातून तणावाचे वातावरण घरात निर्माण होत असे. तरुण वयात कौटुंबिक सुखाचा अभाव व लहानपणापासूनची बिकट आर्थिक परिस्थिती आणि मुंबइतले कामगार संघटनांचे वातावरण यांमुळे अण्णाभाऊंही या चळवळीत, संघटनेत सहभागी झाले. त्यातच अण्णाभाऊंचे संवेदनशील मन सर्व बाह्य घटना टिपत होते पण ते आता हे सर्व भोगलेले, पाहिलेले, अनुभवलेले व्यक्तही करु लागले होते. समतेसाठी झगडणाऱ्या विचारांकडे अण्णाभाऊं अधिक

आकर्षित होत होते. तेव्हाच कम्युनिस्ट विचारांचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला व ते या विचाराकडे झुकले. त्यांचे विचार आंदोलने, समतेसाठीच्या चळवळी त्यांना पटत असत. पुढे कम्युनिस्ट पक्षातच सामील होऊन पक्षाचे कार्य करायला सुरुवात केली. पक्षाचे काम चालू असतानाच त्यांच्या प्रतिभेला प्रोत्साहन मिळाले. व त्यातूनच 'अकलेची गोष्ट', 'खापऱ्या चोर' ही लोकनाट्ये लिहून सादर केली.[६]

आपल्या चुलत भावाकडून, ज्ञानदेवकडून व रोजंदारीवर काम करत असताना वाचायला शिकलेल्या अण्णाभाऊंनी मुळातच मानवतेवर आधारित ढीगभर पुस्तके वाचली असावी. म्हणूनच त्यांच्या हातून, वास्तवाला, समाजजीवनाला स्पर्शून जाणाऱ्या अनेकांगी असणाऱ्या कलाकृती निर्माण झाल्या. आर्थिक ओढाताण असतानाही त्यांनी अशी वास्तवतेवर, जीवनप्रश्नांवर भर देणारी अनेक पुस्तके आपल्या संग्रही ठेवली होती. त्याचबरोबर ज्ञानेश्वरांपासून ना. सी. फडक्यांपर्यंतचे मराठी साहित्य त्याचबरोबर हिंदी साहित्यही वाचले होते. अशा मराठी, हिंदी व इतर भाषांतरीत साहित्याच्या सततच्या वाचनाने ज्याप्रमाणे लेखणी प्रगल्भ होण्यास मदत होते तसेच अण्णाभाऊंचा लेखन विचार, त्यांची प्रतिभाही प्रगल्भ होऊन लेखनविषयक एक स्वत:ची अशी सामाजिक बांधिलकी व्यक्त करणारी भूमिका तयार झाली.

अण्णाभाऊंनी स्वत: जीवनाचा घेतलेला अनुभव, पाहिलेले जगातील वास्तव, भोगलेले जीवन प्रश्न यांच्या चिंतनातून व प्रचंड वाचनातून त्यांच्या साहित्यातील सामान्य वर्गातील नायक उभा राहिला. जो तळागाळातील माणूस, समाज, उपेक्षित वर्ग त्यांनी पाहिला त्याच माणसांच्या जीवनावर साहित्य निर्माण करण्यास अण्णाभाऊंनी गती घेतली व एक आजपर्यंतचे दुर्लक्षित जग, उपेक्षित जीवन यांनी या मराठी सारस्वताच्या कोंदणात स्थान मिळविले.

कम्युनिस्ट पक्षाचे कार्य करत करत त्याच विचाराचे अनुयायी बनलेल्या अण्णाभाऊंना १५-१६ वर्षाचे असतानाच तत्कालीन समाजातील घडामोडींची जाणीव झाली होती. अण्णाभाऊ त्या काळात ज्या समाजामध्ये वावरत होते. तेथे दोन स्तर होते. एक पोट भरण्यासाठी चोऱ्या करणारा तर दुसरा स्तर म्हणजे स्वातंत्र्य मिळविण्याच्या लालसेने चळवळीत काम करणारा होता. अण्णाभाऊंचे लहानपण ज्या भागात गेले त्या भागातील असंख्य तरुण मुले स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात उड्या घेत होती. त्या चळवळींचाही अण्णाभाऊंवर प्रभाव पडला होता.[७] असे अण्णाभाऊ साठे यांचे अभ्यासक डॉ. बाबुराव गुरव यांनी म्हटले आहे.

त्या काळात ज्याला जो विचार रुचत असे तो त्या संघटनेचा कार्यकर्ता होत असे. अशा या धामधुमीच्या वातावरणात, अठरा विश्व दारिद्रय भोगणाऱ्या, उपेक्षित, दुर्लक्षित उपाशी माणसाला मार्क्सचा साम्यवादी विचार रुचला आणि पटला नाही तरच नवल. असा हा विचार रुचलेला प्रत्येकजण त्याचा पाईक बनतो. हाच अनुभव अण्णाभाऊंनाही आला आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे राहण्यापूर्वीच साठे कम्युनिस्ट विचारांचे अनुयायी बनले व इतरांवरही हा विचार रुजवू लागले. हे करण्यासाठी त्यांच्यातील लेखक, गायक सर्वच जण त्यांना हातभार लावत व त्यातूनच सनातनी परंपरेला मुठमाती आणि पुरोगामी विचारांचा पाठपुरावा करणारे, उपेक्षितांला त्याच्या हक्काची जाणीव करुन देणारे, माणसांच्या शोषणांविरुद्ध पेटविणारे, त्यांची अस्मिता जागृत करणारे लावण्या, पोवाडे, लोकनाट्ये, कथा, कादंबऱ्यांचे साहित्य त्यांनी निर्माण केले. अण्णाभाऊंनी जे जे बघितले, जे जे सोसले तेच त्यांनी लेखणीतून उभे केले. ज्या गावात, भागात, माळरानात त्यांचे बालपण गेले त्याच भागातील माणसे त्यांच्या साहित्यातून पुढे आली. ती माणसे गुन्हेगार होती पण त्यांची नीतीमत्ता मात्र अजूनही जिवंत होती आणि म्हणूनच पोटाची आग विझविण्यासाठी गुन्हेगार बनलेल्या किंबहुना बनविल्या गेलेल्या समाजव्यवस्थेवर त्यांनी घाव घातले. गुन्हेगारांच्यातील माणुसकीला उजेडात आणले. म्हणूनच अण्णा भाऊ साठे हे नाव उच्चारताच त्यांनी कम्युनिस्ट विचारांच्या प्रसारासाठी उभे केलेले लाल बावटा कलापथक, श्रमिक मजूर, शोषकाची भूमिका बजावणारा भांडवलदार, उच्च वर्गीय समाज, जाती-जमातीतील प्रेम, अन्यायाविरुद्ध लढणारी माणसे, स्वत:च्या शीलरक्षणासाठी अखेरपर्यंत झगडणाऱ्या नायिका, व या सर्वांबरोबर येणारे ग्रामीण जीवन व्यवहार दर्शन हा सर्व चलचित्रपटाप्रमाणे सरकणारा लेखनविषय प्रवास डोळ्यांसमोर तरळून जातो.

जीवनाच्या व्यापक अनुभवांच्या कार्यशाळेत घडलेला हा हाडाचा लेखक तत्कालीन, बोधवादी, रंजनवादी, कलावादी, जीवनवादी असे साहित्याचे स्वरुप ठरविण्यासाठी लागलेल्या या वादात न पडता यांनी मात्र वास्तव जीवनाचे वस्तुनिष्ठ चित्रच साहित्यातून उभे केले. ज्या सामान्य समाजात ते वाढले त्या समाजाच्या सुखदु:खाशी, त्यांच्या जीवनलढ्याशी आपली नाळ त्यांनी अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण नायकांबरोबरच शहरी समस्यांनी वेढलेले शहरी जीवन, मजूर, हमाल, वेश्या, दलाल, गुंड, भिकारी, दरोडेखोर हीच माणसे त्यांच्या लेखनाचा विषय ठरली.

अशाप्रकारे, वास्तव जीवनाला मूर्त रुप देण्याच्या वृत्तीतूनच अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही त्याचप्रकारे होत गेली.

## ०५. अण्णाभाऊंच्या साहित्यलेखनाच्या प्रेरणा :

ज्या परिस्थितीत अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली त्या परिस्थितीतूनच त्यांच्या, लेखनविषयक प्रेरणांनी, भूमिकांनी जन्म घेतल्याचे जाणवते. एक लेखक म्हणून जरी अण्णांची साहित्यविश्वात सुरुवात झाली नसली तरी सुरुवातीच्या काळात शाहिरी पोवाडे, गाणी यांच्यातून अण्णाभाऊंची प्रतिभा आकाराला येऊ लागली व याच प्रतिभेला पुढे त्यांनी वास्तवानुभूतीची, त्यांच्या माणसांची, त्यांच्या जीवनकथांची, परिसराची जोड दिली. म्हणूनच अवघ्या लोकांचा लेखक म्हणून ते जनमानसात प्रसिद्धीस आले.

अण्णाभाऊंनी पोवाडे, शाहिरी सादर करता करताच त्यांचा 'खुळंवाडी' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यांच्या लेखनविषयक प्रेरणांविषयी जेंव्हा जाणण्याचा प्रयत्न अभ्यासक संशोधक करतात तेंव्हा त्यांच्या लेखनामध्ये त्यांच्या लेखनविषयक प्रेरणा दिसतात. ते आपल्या 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात,

''माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांना विद्रूप करणं मला आवडत नाही. नव्हे, मला भीती वाटते. ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितानं आपल्या तळहातावर पेलली आहे, असे मी मानतो. अशा माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करु नये असं माझं मत आहे. वैफल्य हे तरवारीच्या धुळीसारखं असतं नि ती धूळ झटकून तरवार लखलखीत करता येते.''[८]

अशा या त्यांच्या प्रस्तावनेतील विचारांतून, माणसांवर प्रेम करणारा हा एकांड्या लेखक माणसाच्या श्रमशक्तीवर विश्वास दाखवून त्याला जगण्याची व इतरांना जगवण्याचीही प्रेरणा देतो. माणसांना विद्रूप करणे अण्णाभाऊंना आवडत नाही कारण त्यांचा असा विश्वास आहे की, ही पृथ्वी शेषाच्या नाही तर याच दलित, श्रमिक कामगाराच्या हातावर पेलली असल्याचे ते मानतात.

पुढे ते म्हणतात, ''मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारतायेत नाही. त्या बाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो.... एकंदरीत माझी माणसं ही वास्तव आहेत नि जिवंत आहेत.''[९]

अशा स्वत:च्या अनुभव विश्वावर व जीवनातील स्वत:च्या व इतरांच्याअनुभवावर आधारीत लेखन अण्णाभाऊंनी केले. कल्पनेच्या भराऱ्या न मारता वास्तव जीवन चित्रणावर लक्ष केंद्रित करुन तोच आपला लेखनविषय बनविणारे अण्णाभाऊ म्हणूनच इतरांपेक्षा वेगळे ठरतात.

नवकथांच्या निर्मितीतून समाजमनात प्रसिद्धी मिळविलेल्या इतर लेखक साहित्यिकांच्या व त्यांच्या लेखनांच्या तुलनेत अण्णाभाऊ त्यांची सामाजिक, आर्थिक, भौगोलिक पार्श्वभूमी पूर्ण वेगळी आहे. त्यामुळेच सदाशिवपेठी लेखनात आलेल्या कल्पनारम्यतेपेक्षा स्वप्नरंजनापेक्षा सामान्य माणसाला वास्तव जीवन चित्रण अधिक जवळचे वाटले म्हणूनच अण्णाभाऊंसारखा लेखक आपल्या लेखनामधून त्यापाठीमागची प्रेरणा व भूमिका ठासून सांगत होता. त्यांच्या साहित्याचा वाचकवर्ग कष्टकरी श्रमिकातून येत होता. अशा या कष्टकरी, श्रमिक,कामगार वर्गाशी प्रामाणिक राहूनच त्यांनी लेखन केले.

'खुळंवाडी' या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहित असताना, आचार्य अत्रे म्हणतात की, ''अण्णाभाऊंची कथा ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे....''[१०]

अण्णाभाऊ ज्या भागात घडले त्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील रग त्यांनी त्यांच्या माणसांमध्येही पाहिली व तीच चितारली. आंतरिक आवेगाने व सृजनाच्या सामर्थ्याने अण्णाभाऊंनी त्यांची माणसे शब्दांतून सजीव व सचेतन केली म्हणूनच, 'फकिरा', 'आवडी', 'वारणेचा वाघ' मधील हिंदुराव व मंगला, वारणेच्या खोऱ्यातील सर्व असहाय बहिणींचा भाऊ बनलेला सत्तू भोसले, चित्रा, वैजयंता अशी एक ना अनेक पात्रे सांगता येतील जी त्यांच्या आंतरिक आवेगामुळे व या माणसांवरच्या त्यांच्या प्रेमामुळेच जिवंत झाली व या शब्दांच्या विश्वात अमर ठरली.

स्वातंत्र्यचळवळीच्या कालखंडात नव्या समतावादी विचारधारणा घेऊन लढणारी माणसे त्यांनी पाहिली. सामाजिक जडणघडणीत प्रमुख सहभाग असलेल्या महात्मा फुले, आंबेडकर यांच्या समाजप्रेरणांनी प्रेरित होऊनच त्यांचे साहित्य निर्माण होत होते. त्यांना स्व:अनुभवातून जितके दिसले, जितके भावले तितके चित्रांकित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याविषयी अधिक ठाम भूमिका घेताना ते म्हणतात, ''मानवाला तू गुलाम नाहीस, तूच वास्तव जगाचा धनी आहेस, तू जगाचा स्वतंत्र निर्माता आहेस, असा साक्षात्कार करुन देणे हेच खरे माझ्यामते वाङ्मयाचे वैशिष्ट्य आहे.''[११] या सर्व अर्थांनी परिपूर्ण असे साहित्य निर्माण करण्याचे आवाहन ते करतात.

अशाप्रकारे माणसातील अस्मिता जागृत करणारे अस्मितादर्शी दलित जाणीवेचे दर्शन घडविणे हीसुद्धा अण्णाभाऊंच्या साहित्यापाठीमागची प्रेरणा ठरते. अस्मिता जागविणारे लेखन करणारे अण्णाभाऊ वृत्तीने कलावंत होते. म्हणून कामगार, श्रमिक, वर्गाच्या व्यथावेदना मांडणाऱ्या अण्णाभाऊंनी कलावंताच्या दु:खांनाही साहित्यात स्थान दिले. ते 'वैजयंता' या त्यांच्या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते हे मी प्रथम

शिकून मगच लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा नि सभ्य व्हावा, येथे समता नांदावी आणि या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला दररोज स्वप्ने पडतात. ही मंगल स्वप्ने पहात-पहात मी लिहित असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते तर, ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्याने सर्वच दिसते पण ते सर्व साहित्यिकाला हात देत नाही, दगा मात्र देते, माझा असा दावा आहे की, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्यामुळे त्या दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिकपणे निष्ठेने मी चित्रित करणार आहे नि करीत आहे.''[१२]

इतक्या स्पष्ट शब्दांत अण्णाभाऊंनी आपली भूमिका मांडली आहे आणि त्या भूमिकेशी सदैव प्रामाणिक राहून विपुल लेखनही केले.

एकूणच कथा, कादंबरी या रुपातील साहित्यलेखन निर्मितीच्या पाठीमागे या अशा विस्तृत व व्यापक, समावेशक भूमिका घेऊनच त्यांनी लेखन केले.

'लोकनाट्य' चे उद्‌गाते म्हणून लोकनाट्य रचतानाही त्यांनी सामाजिक जाणीव डोळसपणे व्यक्त करुन लोकरंजनाचा प्रयत्न व लोककलांचा बाज कायम ठेवून समाज प्रबोधन हीच भूमिका ठेवली होती. म्हणूनच, मार्क्सवादाच्या प्रभावामुळे त्यांचे लेखन, प्रचारकी थाटाचे आहे असा आरोपही त्यांच्यावर झाला. तरीही त्यांनी साहित्याला जीवनाची जोड देण्याचा स्वत:चा प्रयत्न थांबवला नाही. कष्टकरी जनतेच्या मनातील व्यथा व्यक्त करताना स्वार्थी भोंदू राजकारण्यांच्या ढोंगीपणावर आसूड ओढताना तसेच समाजातील खालच्या थरातील बोकाळलेली बुवाबाजी, अंधश्रद्धा, अज्ञान इ. अवगुणांवर वेळोवेळी कोरडे ओढण्यासाठी 'लोकनाट्य' या कलेचा आधार घेतला. रुक्ष प्रचारी विषय सुद्धा रंजक व अभ्यासू वृत्तीने पोटतिडकीने सादर केले.

कार्ल मार्क्स व आंबेडकर यांनी जीवनभर सांगितलेल्या विचारांचा मेळ अण्णाभाऊंनी आपल्या लेखनात घातला व विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री यांनुसार आपले चारित्र्य घडवत, सत्‌शील होण्यासाठी नि:स्वार्थी, न्यायप्रेमी व्यापक मनोवृत्ती बदलण्याचे आवाहन जे आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण जीवनभर केले त्या वैचारिक तत्त्वांचा स्विकार अण्णाभाऊंनी करुन याच व्यापक तत्त्वांसाठी शेवटपर्यंत आपली लेखणी झिजवली. म्हणूनच त्यांच्या लिखाणातून सर्व उपेक्षित घटकांच्या उद्धाराचा कृतिशील विचार उभा राहिला. त्यांना मानवी मनाच्या दु:खाची दुखरी नस समजली होती. म्हणूनच द्रष्टेपणाने श्रमिकाविषयीचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

अण्णाभाऊंचे साहित्य हे सामाजिक, आर्थिक, विषमतेचा अंत करण्याची प्रबळ प्रेरणा घेऊन संघर्ष उभा करणारे आणि भल्यांचा पुरस्कार व बुऱ्यांचा तिरस्कार करणारे आहे. या अशा सत्-असत्च्या संघर्षातूनच अण्णाभाऊंनी मानवी मनातील मुलभूत प्रवृत्तींना आव्हान करण्यासाठी साहित्य लिहिले. म्हणजेच 'माणूस' हीच त्यांची लेखनप्रेरणा सांगता येते.

साहित्यिकाच्या प्रतिभेतून इंद्रधनुष्य निर्माण होत असतात याचे भान ठेवूनच अण्णाभाऊंनी लेखन केले आणि कृतिशील शब्दांना श्रेष्ठ मानले. शब्दांवर श्रद्धा ठेवत अण्णाभाऊ जनतेशी समरस झाले. जनतेच्या अडीअडचणी, आशाआकांक्षा समजून घेतल्या व त्या आत्मसात करुन त्याच त्यांनी त्यांच्या कलेतून जनतेपुढे मांडल्या.

अण्णाभाऊंची समाजाशी निरंतर बांधिलकी व निष्कलंक निष्ठा असल्यामुळे त्यांचे कोणतेही लेखन मग ते शाहिरी असो, कथा, कादंबरी असो ते जीवनवास्तवाच्या धगीपासून दूर पळताना दिसत नाही. या सर्व लेखन प्रेरणांवरुन अण्णाभाऊंच्या लेखनाची वैशिष्ट्ये मांडता येतील.

## ०६. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये

अण्णाभाऊंच्या एकूणच साहित्य रचनेत प्रथमत: त्यांनी शाहिरी रचनेस सुरुवात केली. सर्वसामान्यपणे १९४२ ला मुंबईला पुनरागमन झाल्यानंतर त्यांनी आपल्या शाहिरी लेखनाला प्रारंभ केला असे अण्णाभाऊंच्या शाहिरी अभ्यासाचे अभ्यासक द. म. पाटील यांनी म्हटले आहे.[१३]

१९४२ च्या शेवटी शाहिर गवाणकर, शाहिर अमरशेख मुंबईला आले. त्यानंतर अण्णाभाऊंचा व त्यांचा परिचय झाला. गवाणकर, अमरशेख व अण्णाभाऊ साठे ही तीन अनमोल रत्ने कम्युनिस्ट पार्टीला मिळाली. यांनी आपल्या ९-१० माणसांचे एक पथक तयार केले. या पथकाला 'लाल बावटा कलापथक' असे नाव दिले. हे पथक ४५-४६ साली स्थापन झाले. या कलापथकाच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी समाजप्रबोधनाचे काम केले.

अण्णाभाऊंनी केलेली शाहिरी रचना सामान्यत: दलित, सामान्य माणूस, कामगार यांनी दीनवाणे, लाचार जिणे सोडून लढले पाहिजे असा संदेश घेऊन जागृती करते. अन्यायाविरोधी चीड निर्माण करणे हेच त्यांच्या शाहिरी रचनेचे वैशिष्ट्य होते.

अण्णाभाऊंची सिद्धहस्त लेखणी 'पोवाडा' या वाङ्मयप्रकारात एक वेगळे रुप धारण करुन रसिकांच्या मनात उतरली आहे. त्यांच्या एकूणच पूर्वावस्थेतील पोवाड्यांची संख्या ११ आहे. या पोवाड्यांमधून कामगारांची दु:खे वेशीवर टांगून मुंबईच्या गिरणी कामगारांची होणारी

अमानुष पिळवणूक चव्हाट्यावर आणली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. अण्णाभाऊंच्या पोवाड्यांनी एकूणच ह्या वाङ्मयप्रकाराला नवा आशय दिला. त्यांची कोणत्याही पक्षाशी बांधिलकी असली तरी पोवाडेकार म्हणून त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. वीरांच्या पराभवांचे रोमहर्षक वर्णन दलित, पिडित, दु:खितांची गाथा व गरीब-श्रीमंतांच्या वर्गसंघर्षातून निर्माण झालेल्या विविध समस्यांवर त्यांनी प्रकाश टाकला. लोकजागृती त्यांनी मनोरंजनाच्या साथीनेच केली.

'लावणी' या महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या प्रकारातील पारंपरिक लावणी व अण्णाभाऊंची लावणी यात प्रचंड मोठा फरक आहे. लौकिक वास्तव या माध्यमातून अण्णाभाऊंच्या प्रतिभेतून प्रकट होते.

पारंपरिक तमाशातील काही वैशिष्ट्ये स्वीकारुन अण्णाभाऊंनी लोकनाट्याची निर्मिती केली. यांत आशयामध्ये आमूलाग्र बदल केले. शेतकरी, श्रमिक वर्ग ही या लोकनाट्यातील पात्रे बनविली आणि शोषण करणारा आणि त्याला बळी पडणारा यांच्यातील संघर्ष, काळाबाजार, अन्नधान्य टंचाई, महागाई, दैन्य-दारिद्रय आणि कर्जबाजारीपणा असे प्रचलित विषय त्यांच्या बहुतांशी लोकनाट्यात आलेले होते. लोकनाट्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, पारंपरिक तमाशातील 'सोंगाड्या' या पात्राला फाटा दिला आणि त्या ठिकाणी वर्गजागृत 'धोंड्या' या नव्या पात्राची निर्मिती केली. मनोरंजनाबरोबर प्रबोधनही केले. गरिबांबद्दलचा जिव्हाळा त्यांच्या लोकनाट्यातून दिसून येतो. धनदांडग्यांकडून होणारी पिळवणूक व त्यापासून संरक्षण करणे हा त्यांच्या लोकनाट्यातील हेतू दिसून येतो.

शाहिरी रचनेनंतर अण्णाभाऊ कथालेखनाकडे वळले. त्यांच्याअगोदर श्री. म. माटे, माडखोलकर, खांडेकर यांनी दलितांच्या जीवनावर कथा लिहिल्या होत्या. या कथांमध्ये दलितांच्या विषयीची सहानुभूती आपल्याला प्रकर्षाने जाणवते. या सर्व लेखकांना दलितांबद्दल कळवळा होता. या पार्श्वभूमीवर अण्णाभाऊ साठे यांचे कथालेखन सहानुभूतीतून न येता प्रत्यक्ष अनुभूतीतून येताना जाणवते. त्यांची कथा अस्सल जीवनानुभूतीतून निर्माण झाली. त्यांचे कथालेखन हे त्यांच्या जीवन अपरिहार्यतेतून निर्माण झाले आहे. कारण ते स्वत:च कल्पनेच्या भराऱ्या मारता येत नसल्याचे मान्य करतात. त्यांची सारी पात्रे या ना त्या कारणांनी त्यांच्या आयुष्यात येऊन गेल्याचे सांगतात.

अण्णाभाऊंचा पहिला कथासंग्रह हा 'खुळंवाडी' या अगोदर यातील कथा इतर मासिकांतूनही प्रसिद्ध झाल्या. नंतर मात्र एकापाठोपाठ एक कथासंग्रह प्रसिद्ध झाले व प्रत्येक कथासंग्रहाच्यावेळी

त्या पाठीमागची भूमिका ते प्रामाणिकपणे स्पष्ट करतात. मग तो 'बरबाद्या कंजारी, 'कृष्णाकाठच्या कथा', 'गजाआड', 'लाडी' इ. कथासंग्रह असो की आणखी कोणतेही. त्यांचे एकूण २० कथासंग्रह प्रसिद्ध झाल्याचे त्यांच्याविषयीच्या थोड्याशा अभ्यासानंतर लक्षात येते. लोकजीवनामध्ये जे-जे अनिष्ठ आहे, अमानुष, दांभिक आहे त्या सर्वांचा धिक्कार त्यांच्या कथांतून केलेला दिसून येतो. त्यामुळे कथा वाङ्मयात अण्णाभाऊंचे स्थान जवळजवळ अढळ आहे.

मराठी साहित्यात 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार समृद्ध असाच आहे. बाबा पद्मनजी, ह.ना. आपटे, खांडेकर, फडके अशा अनेक साहित्यिकांनी मराठी कादंबरीला समृद्ध केले आहे. अण्णाभाऊ ज्या काळात लेखन करीत होते तो काळ फडके युगाचा भरभराटीचा काळ होता. फडके रंजनप्रधान तर खांडेकर विशिष्ट जीवनवादी ध्येयाने प्रेरित होऊन लेखन करीत होते. अण्णाभाऊंच्या लेखनावरही यांचे पडसाद उमटलेले आहेत. परंतु, 'कलेसाठी कला' की, 'जीवनासाठी कला' या वादात न पडता अण्णाभाऊंनी स्वत:च्या प्रेरणेनुसारच कादंबरी लेखन केलेले दिसून येते. गुलामगिरीच्या कचाट्यात सापडलेला दारिद्र्याने गांजलेला अगतिक झालेला माणूस केंद्रस्थानी मानून अण्णाभाऊंनी कादंबरी लिहिली आहे. हा माणूस गुलामगिरीची बंधने झुगारुन बाहेर पडतो आहे, संघर्षासाठी उभा राहतो आहे हे अण्णाभाऊंचे स्वप्न होते आणि त्याचे चित्रण अण्णाभाऊंनी आपल्या कादंबरीतून केले आहे. 'वारणेच्या खोऱ्यात', 'फकीरा', 'चित्रा', 'माकडीचा माळ', 'चंदन', 'वैजयंता', 'आवडी', 'अलगुज', 'चिखलातील कमळ', 'वारणेचा वाघ' इ. कादंबऱ्या अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या आहेत.

या कादंबऱ्यांवर नजर टाकताच त्यांच्यातील वैशिष्ट्यपूर्णता चटकन नजरेत भरते. त्यांच्या कादंबऱ्यातून, जे कर्तबगार आहेत पण, मानवाच्या मुलभूत हक्कापासून दूर आहेत अशांच्या जीवनावर प्रकाश टाकणे हा अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या कादंबऱ्या मानवतावादी दृष्टिकोनातून अवतरतात. डॉ. बाबुराव गुरव अण्णाभाऊंच्या कादंबरीबद्दल म्हणतात, ''अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा सगळा प्रवास आंतरिक तळमळीतून कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा स्वीकार आणि दर्शन त्यावरुन जीवनाचे दर्शन आणि त्या साऱ्यांच्या मधून कलामूल्यांचा वेध असा आहे.''[१४]

अण्णाभाऊंची कादंबरी वाचल्यानंतर बाबुराव गुरव यांचे हे मत आपल्याला पटते. अण्णाभाऊंच्या एकूणच लेखनाने दिलेली मानव्याची विशाल जाणीव दलित, पतिताला एका उच्च पातळीवर नेते व जगण्याची नवी रीत दाखविते. माणूस म्हणून जगण्याचा आत्मविश्वास देते.

अण्णाभाऊंच्या साहित्याने उपेक्षितांच्या अर्थशून्य मानल्या गेलेल्या जीवनात माणुसकीची अर्थपूर्णता असल्याचेही दाखवून दिले व या अर्थपूर्ण असलेल्या जगाला प्रतिष्ठितही केले.

अण्णाभाऊंनी उपेक्षित जगाला चित्रित करताना या उपेक्षितांमधील स्त्रियांची दु:खे सुद्धा त्यांनी मांडली व शीलरक्षणासाठी, अस्मितारक्षणासाठी अखेरपर्यंत झुंज देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात ओतले. मग ती 'वैजयंता' या कादंबरीची नायिका वैजयंता असो वा आवडी, वा चंदन, चित्रा अशा अनेक नायिका त्यांनी प्रस्थापितांविरुद्ध लढा देण्यासाठी उभ्या केल्या. अण्णाभाऊंपूर्व मराठी वाङ्मयात ज्या स्त्रीसमस्या प्रधान चित्रणाचा अभाव होता. ह्या प्रतिकुल पार्श्वभूमीवर अण्णाभाऊंच्या स्त्री-रुपांचा आविष्कार लक्षणीय ठरला. या स्त्रीरुपाचा आविष्कार अण्णाभाऊ वाघ्यामुरळी, महानगरीय झोपडपट्टी मानवी जीवनातील विकृतता अशा पार्श्वभूमीतून या सर्वांचे जिवंत दर्शन कादंबऱ्यांमधून त्यांनी स्त्री नायिकेच्या माध्यमातून घडविले. उच्चभ्रू समाजातील, सवर्ण नायिका, प्रतिष्ठित समाजातील स्त्री नायिका आजपर्यंत मराठी साहित्यात वेगवेगळ्या प्रकारे पहायला अभावानेच मिळाली पण, अण्णाभाऊंनी संपूर्ण दुर्लक्षित, उपेक्षित अशा झोपडपट्टी, तमाशा कलावंत, अशा सामाजिक पार्श्वभूमीतून या नायिका उभ्या केल्या. त्यामुळेच आधुनिक मराठी साहित्याच्या कक्षा व्यापक करण्यास हे सर्व घटक कारणीभूत ठरले आहेत.

जीवन जगण्यासाठीची नायिकांमध्ये ओतलेली ऊर्मी अण्णाभाऊंना मार्क्सवादानेच दिली होती. कारण, मार्क्सवादामुळेच आदर्श जीवन व्यवस्थेचा संस्कार त्यांच्यावर ते जेव्हा या पक्षात सामील झाले तेव्हापासूनच झाला होता. याच आदर्श समाजजीवन व्यवस्थेचा ध्यास अण्णाभाऊंना होता. म्हणूनच त्यांच्या साहित्यातून माणसाच्या संघर्षशक्तीवर, परिवर्तनशीलतेवर विश्वास दाखविला गेला. मार्क्सवादाने दिलेल्या प्रेरणेवरचा त्यांचा विश्वास त्यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांना जोडलेल्या प्रस्तावनेतूनही व्यक्त केला आहे. स्वप्नरंजन, कल्पनाचमत्कृती याला नकारही ते केवळ वास्तवावर आधारित कम्युनिस्ट पक्षाचे खंदे कार्यकर्ते असल्यामुळेच देऊ शकले होते. यातूनच आपली मूळ सांस्कृतिक परंपरा न नाकारता जीवनातील अनुभवाला वास्तवाच्या पायावर उभे करुन अण्णाभाऊंनी रंजनाला सामाजिक ध्येयाची जोड देऊन अजोड साहित्य निर्मिती केली. यामुळेच अण्णाभाऊ मार्क्सवादी चळवळीचे अपत्य ठरतात व कम्युनिस्ट चळवळीच्या धारणेप्रमाणेच त्यांनाही भारतीय दु:ख हे वर्गीय असल्याचेच वाटत होते.

वर्गीय असलेल्या या दु:खात स्त्रीचे दु:ख त्याहूनही भयानक होते. त्यांची कादंबरीत येणारी स्त्री मनस्वी जीवन जगणारी व येणाऱ्या संकटाला धीराने सामोरी जाणारी होती. ती अत्यंत साधी

असल्यामुळेच जीवनाबद्दलच्या उदात्त कल्पना तिच्या डोक्यात नाहीत. ज्या उपेक्षित, दुर्लक्षित स्त्रियांचे जग अण्णाभाऊंनी कादंबऱ्यातून उभे केले त्या 'चंदन', 'आवडी', 'वैजयंता' या कादंबऱ्या स्त्री समस्यांच्या दृष्टिकोनातून लक्षात घेण्यासारख्या आहेत.

वेश्या जीवनावर आधारित 'चित्रा', तमाशावर बेतलेली 'वैजयंता', मुरळीच्या जीवनातील समस्या मांडणारी 'चिखलातील कमळ', स्त्रीसुलभ जीवनातील कोंडमारा टिपणारी 'आवडी', यांसारख्या कादंबऱ्यातील स्त्रियांचे विश्व तत्कालीन मराठी साहित्याला पूर्णपणे नवे होते. या कादंबरीत येणारी स्त्रीही नवी आहे. ही स्त्री जीवनाबद्दलच्या कमीतकमी अपेक्षा व्यक्त करते पण जेव्हा ती, समाजव्यवस्थेच्या गर्तेत अडकत अडकत खोल कुठेतरी नाशाकडे जात असल्याची खूण तिच्या लक्षात येते तेव्हा ती पूर्ण क्षमतेनिशी एकाकीपणेच लढण्यास सिद्ध होते. ही स्त्रीची लढाई उभी करताना अण्णाभाऊ या स्त्रियांचेही दोन वर्ग पाडताना दिसतात. एक म्हणजे पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रिया आणि दुसरा म्हणजे परंपरेला छेद देऊन स्वत:ची अस्मिता, स्वत्व टिकविणाऱ्या स्त्रिया. अण्णाभाऊंची लेखनभूमिका, त्यांच्या प्रेरणा यांकडे पाहिल्यानंतर अण्णाभाऊ दुसऱ्या वर्गातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात; व त्यांच्यात जगण्याची ऊर्जा निर्माण करतात. इथे स्वत: अण्णाभाऊंचा त्यांच्या विचारप्रणालीतून साकार झालेला स्त्रीविषयक दृष्टिकोन व स्त्री-रुपांचा आविष्कार लक्षणीय व महत्त्वाचा ठरतो.

मार्क्सवादाच्या मुशीत तयार झालेले अण्णाभाऊ साम्यवादी चळवळीच्या प्रभावाने एक विशिष्ट अशी भूमिका घेऊन लेखन करतात. म्हणून अण्णाभाऊंच्या कादंबऱ्याही अपेक्षित परिणाम साधतात.

'चंदन' ही अण्णाभाऊंची कादंबरी ही अशाच असहाय स्त्रीची व्यथात्मिका आहे. भांडवलदार, धनाढ्य लोक गरीब अशा चंदनचे जमेल त्या रुपात शोषण करताना दिसतात. ही दुर्दैवी मजूर स्त्री स्त्रीचे जीवन जगताना झोपडपट्टी दादांच्या रुपातील शोषकांबरोबर लढताना आढळते. येथेही ज्याप्रमाणे मार्क्स आणि त्याचे तत्त्वज्ञान शोषित कामगारांच्या बाजूने होते. त्याप्रमाणेच अण्णाभाऊंही चंदनच्या बाजूने उभे राहतात. या सर्व अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ देतात.

'वैजयंता' ही कादंबरी कलावंतांचे दु:ख मांडते. मार्क्सवादाने कितीही पछाडलेले अण्णाभाऊ असले तरी त्यांनी आपली सांस्कृतिक परंपरा न नाकारता त्यांच्यामधला मूळ कलेचा शिलेदार जागा ठेवून त्याचे दु:ख मांडले. त्यातूनच तमाशातल्या नर्तिकेलाही चारित्र्य, व्यक्तिमत्त्व आणि स्वतंत्र प्रेमभावना असते हे सिद्ध करणारी लढाऊ वैजयंता सापडते.

'आवडी'ही सुद्धा परंपरेला छेद देणारी नायिका, पैलवान भावाने केलेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी घरदार सोडून रामोशी समाजातील प्रियकराची साथ करणारी चौगुल्याची आवडी या कादंबरीत आढळते.

या सर्व नायिका साकारताना अण्णाभाऊंचे माणसांवर व त्यांच्या जगण्यावर असलेले प्रेम दिसून येते व ही माणसे त्यांची आहेत व ती त्यांना कुठे न कुठे तरी भेटल्याचेही जाणवते. या नायिकांना मूर्त रुप देताना कुठेही कादंबरीच्या कलात्मकतेला व कलाकृतीच्या मूळ प्रकृतीला कसलीही बाधा येऊ न देता भांडवलशाही वृत्तीचा पाडाव करणारी व शेवटी सत्याचा विजय दाखविणारी मांडणी केलेली आहे, त्यांच्या या विचारांच्या मागे मूळ प्रेरणा साम्यवादाची असल्यानेच हा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

कलात्मकते इतकेच सामाजिकतेला महत्त्व देण्याच्या अण्णाभाऊंच्या वृत्तीचे मूळ त्यांच्या मार्क्सवादी विचारात आढळते. त्यांनी आपल्या कादंबरीतून वर्गाधिष्ठित समाजरचनेला बाहेर काढले. शोषक व शोषित, सत्-असत् या संघर्षात शेवटी सत्याचाचं विजय होतो हेच चित्रित केले आहे.

**०७. समारोप :-**

अण्णा भाऊ साठे यांचा एकूण जीवनप्रवास, या जीवनप्रवासात आलेले अनुभव भोगलेली उपासमारी, दिवसभराच्या श्रमानंतरही मोबदला मिळविण्यासाठी जी लाचारी त्यांनी स्विकारली या सर्व जीवनानुभवातून अण्णा भाऊ खूप काही शिकत होते. त्याच्याच जोडीला कम्युनिस्ट विचारांचा प्रभाव यांच्यातील सुसंवादामुळे अण्णाभाऊ घडत होते.

विषम वर्गव्यवस्थेचे मुंबईतील जीवन, तेथील गलिच्छपणा, पोट भरण्याची मारामार असणाऱ्या कामगार वर्गाचे कष्टप्रद जीवन हे सर्व अण्णाभाऊंना अंतर्मुख करत होते. ही त्यांची अंतर्मुखता त्यांच्या संवेदनाक्षम प्रगल्भ मनाची साक्ष देते. यामुळेच त्यांचे कादंबरीलेखन वाचकांनाही अंतर्मुख करते. त्यांच्या लेखनावर असलेली साम्यवादाची छाप ही ठिकठिकाणी जाणवते. कारण, लोकशिक्षण, लोकजागृती, प्रबोधन ही भूमिका घेऊनच त्यांनी लेखन करण्यास सुरुवात केली होती. त्या भूमिकेशी ते सदैव प्रामाणिक राहतात.

## ०८. निष्कर्ष :-

१) पूर्णपणे वास्तवतेच्या पायावर उभे असलेल्या व जीवनात बदल घडवून आणणाऱ्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाशी अण्णा भाऊ संबंधित होते.

२) मार्क्सवादाचा प्रभाव असलेल्या इतर साहित्य व साहित्यिकांपेक्षा अण्णाभाऊंचे साहित्य पूर्णपणे वेगळे अनुभवविश्व उभारते.

३) अण्णाभाऊंनी जे पाहिले, अनुभवले व जगले यातूनच त्यांची लेखनविषयक प्रगल्भ भूमिका तयार झाली.

४) माणूस त्याची श्रमशक्ती, त्याचा जीवनसंघर्ष हेच अण्णाभाऊंच्या साहित्यनिर्मिती पाठीमागचे मुख्य स्त्रोत होते.

५) अण्णाभाऊ कलात्मकतेइतकेच सामाजिकतेला महत्त्व देतात. त्यांच्या या वृत्तीचे मूळ त्यांच्या मार्क्सवादी विचारात आढळते.

६) शोषक-शोषित, सत्-असत् असा मानवी वृत्तीतील संघर्ष व शेवटी सत्याचा विजय हे त्यांच्या लेखनाचे मुख्य सूत्र होते.

## ०९. संदर्भ :

१. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) : मराठी विश्वकोश खंड - १३, मार्क्स कार्ल पृ. क्र. ३८०.

२. पाटणकर रा. भा. : सौंदर्यमीमांसा, मौज प्रकाशन गृह, प्रकरण ६ वे, ६.७, पृ. क्र. १६३.

३. जोशी प्र. न. : अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास १८०० ते १९६०, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आवृत्ती २ री, पृ. क्र. १३५.

४. पवार ज. वि. : 'दवा दारु' (कविता)

५. मटेकर वि. ब. : असे होते अण्णाभाऊ, छाया प्रकाशन, एरंडवणा, पुणे, पृ. क्र. २०.

६. गायकवाड आसाराम (संपा.) : लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे संदर्भ ग्रंथ, १९९६, झेप प्रकाशन, पृ. क्र.२०.

७. गुरव डॉ. बाबुराव : 'अण्णाभाऊ साठे : समाजविचार व साहित्यविवेचन', लोकवाङ्मयगृह मुंबई - २५, आवृत्ती २ री १९९९, पृ. क्र. १४.

८. साठे अण्णाभाऊ : 'बरबाद्या कंजारी', कथासंग्रह, विद्यार्थी प्रकाशन, पुणे - ९, प्रस्तावना.

९. साठे अण्णा भाऊ : 'बरबाद्या कंजारी' उनि. प्रस्तावना.

१०. साठे अण्णा भाऊ : 'खुळंवाडी', कथासंग्रह, प्रस्तावना.

११. साठे अण्णा भाऊ : २ मार्च १९५८ दलित साहित्य उद्घाटनपर भाषण.

१२. साठे अण्णा भाऊ : 'वैजयंता', मॅजेस्टिक प्रकाशन बुक स्टॉल, पुणे, आवृत्ती ४ थी, १९७८ (प्रस्तावना).

१३. पाटील द. म. : अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय, पंचगंगा प्रकाशन, मार्च २००७. पृ.क्र. ४८.

१४. गुरव डॉ. बाबुराव : 'अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन, उनि. पृ. ६५


-----x-----